# मराठी

( अनिवार्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 300 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

# MARATHI

**( Compulsory )**

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 300 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.

www.reliableacademy.com 9222333999

**1.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* लोकशाहीत न्यायसंस्थेची भूमिका

*(b)* पर्यावरण आणि आत्मनिर्भरता

*(c)* जागतिकीकरणात भाषेची भूमिका

*(d)* भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने

**2.** पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा : 12×5=60

संपूर्ण जगाला गांधीजींनी आकर्षित केले कारण त्यांनी हिंस्र-शक्तींच्या विरोधात आत्मशक्तीचे अस्त्र उगारले. तोफा आणि मशीनगन यांचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसेचा आश्रय घेतला. एका गोष्टीचा मात्र विचार करावा लागतो की शेवटी गांधीजींनी अहिंसेचा आश्रय का घेतला? एक तर त्यांना असे वाटले असावे की इंग्रजांविरुद्ध हिंसक मार्गाने देशाला स्वाधीन करता येणार नाही. किंवा त्यांना समाजाला या गोष्टीची जाणीव करून द्यायची असावी की जो पर्यंत मनुष्य पाशवीपणाचा त्याग करणार नाही तो पर्यंत त्याला स्वतःला माणूस म्हणवून घेता येणार नाही. यातील पहिली गोष्ट म्हणजे 'अहिंसा' हे कमकुवत आणि अगतिक माणसाचे साधन आहे. म्हणजे जो पर्यंत आपल्या जवळ तोफा नाहीत तोवर आपण अहिंसेचा आश्रय घेतो. मात्र दूसरी बाब अशी की अहिंसा हे माणसाच्या उन्नतीचे साधन आहे; त्याच्या शुद्धिकरणाचा मार्ग आहे.

एक गोष्ट नक्कीच स्वीकारावी लागते की जेव्हां गांधीजींच्या नेतृत्वात भारतीय लोक इंग्रजांविरुद्ध संघर्ष करीत होते तेव्हां बहुतेकांना असेच वाटत होते की अहिंसा हे निव्वळ साधन आहे. कारण इंग्रजांविरुद्ध शस्त्रांचा वापर करण्याची क्षमता आणि सिद्धता आपल्या जवळ नाही. मात्र गांधीजींना तसे वाटत नव्हते. अहिंसकतेला रामावुन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा विचार गांधीजींना मान्य नव्हता. देशाचे स्वातंत्र्य हे एक मोठे ध्येय होते. पण त्या बरोबरच माणसाच्या वृत्तीत बदल घडविणे हे त्याही पेक्षा मोठे ध्येय होते. माणसाला या गोष्टीची जाणीव करून द्यायची होती की ध्येयप्राप्ती ही हिंसाचाराऐवजी माणुसकीच्या मार्गानेही साध्य करता येते. गांधीजींचे मुख्य ध्येय देशबांधवांच्या कष्टांचे निराकरण करणे तर होतेच शिवाय त्यांना लोकांना पाशवीपणा-पासूनही परावृत्त करायचे होते. व्देष, राग आणि साहस या गोष्टी फक्त पशुंकडेच असतात आणि ते शत्रूचा प्रतिकारही हिंसक वृत्तीनेच करतात. पण माणूस हा पशूंपेक्षा वेगळा ठरतो त्यामुळे त्याने आपल्या मनस्वीपणावर नियंत्रण ठेऊन स्वतःच्या रोजच्या समस्या सोडविण्यासाठी तोच मार्ग स्वीकारला पाहिजे जो पशूंना शक्य नसून फक्त माणसांना शक्य आहे. मात्र एक प्रश्न पडतोच की गांधीजींनी हा मार्ग का स्वीकारला? शिवाय अहिंसेचा प्रयोग इतर कोणत्याही देशात न होता भारतातच का झाला? 'हा निव्वळ योगायोग आहे' असे म्हणत काही लोक या प्रश्नाला बगल देतील. मात्र तसे नव्हते. असे सांगण्यात येते की सत्याग्रह किंवा विनयपूर्वक आज्ञाभंग ही संकल्पना अमेरिकेतील विचारवंतांना देखील माहीत होती आणि राशियाचे संत साहित्यकार टॉलस्टॉय यांनाही त्याची जाणीव होती. थोरो आणि

www.reliableacademy.com 9222333999

टॉलस्टॉय या दोघांचे विचार गांधीजींना माहीत होते. आपल्या देशातही गांधीजींच्या अगोदर अरविंद यांनी विनयपूर्वक आज्ञाभंग आणि 'असहकार' याचा प्रस्ताव मांडला होता. तरी देखील एक प्रश्न उरतोच की याचा वापर भारतातच सर्वात पहिल्यांदा का झाला?

उत्तर स्पष्ट आहे की—आत्मशक्ती ही शारीरिक शक्तिपेक्षा श्रेष्ठ आहे आणि ही गोष्ट जितकी चांगल्याप्रकारे भारतीयांना माहीत होती तितकी इतर देशातील लोकांना नव्हती. थोरो, टॉलस्टॉय, इमर्सन किंवा रोमा रोला यांच्या मनातही जेव्हा ही भावना निर्माण झाली तेव्हां त्या मागे भारतीय तत्त्वज्ञानच होते. विनयपूर्वक आज्ञाभंग या संकल्पने पर्यंत पोचण्याचे तत्वज्ञान या देशात होते. या संकल्पनेपर्यंत तीच व्यक्ती पोचू शकते जी एकतर भारतीय विचारसरणीच्या प्रभावात वाढलेली असेल किंवा भारतीय विचारसरणीच्या प्रभावात अनायासपणे आली असेल. थोरो आणि टॉलस्टॉय या दोघांच्या बाबतीत या दोन्ही शक्यता आहेत. राहिले अरविंद ! ते तर भारतीयच होते.

*(a)* संपूर्ण जग गांधीजींकडे कोणत्या गोष्टीमुळे आकर्षित झाले? 12

*(b)* स्वातंत्र्यप्राप्तीसाठी गांधीजींनी 'अहिंसा' हेच मुख्य साधन का मानले? 12

*(c)* लेखकाने माणूस आणि पशू यांच्यात कोणते अंतर सूचित केले आहे? 12

*(d)* 'अहिंसा' या तत्त्वप्रणालीचा प्रारंभ भारतातच का झाला? 12

*(e)* विनयपूर्वक आज्ञाभंग या संकल्पनेपर्यंत कोणाला पोचता येते? 12

**3.** खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा : 60

इतिहास आणि काळ यांच्या नियम-कायद्यांचे जितके ज्ञान आज माणसाला आहे, तितके ज्ञान बहुतेक या पूर्वी कोणत्याही काळात नसावे. त्यामुळेच तो खऱ्या अर्थाने 'इतिहास-पुरुष' ठरतो. इतिहासाचे आकलन म्हणजेच आधुनिकता असे मानले जाऊ लागले आहे. मध्ययुगीन संस्कृतीत धर्म हे केंद्रवर्ती होते. आता हळू-हळू हे स्थान इतिहासाला देण्यात येत आहे. माणूस हा निसर्गाला अनुसरून जगत नसून इतिहासाच्या संदर्भात जगत असतो. त्यामुळे प्रत्येक घटना ही पूर्वीच्या घटनेपेक्षा नवी असते. जे आता घडते आहे ते या पूर्वी कधी घडले नाही. माणसाचा हा उत्तरोत्तर विकास प्राचीन ग्रीक लोकांसाठी अपरिचित आणि परका होता. शिवाय भारतीय विचारवंतांनाही तो तितकाच अपरिचित होता. या मंडळींच्या मते काळ म्हणजे प्रगती नसून आवर्त आहे. पूर्वीच्या काळात पूर्वापार परंपरा माणसाच्या मनात घर करून होत्या आणि त्याच त्याच्या जगण्याला आकार देत होत्या. आता इतिहास माणसाचे भविष्य ठरवतो आणि परंपरांचा शोध घेण्यासाठी त्याला मागे वळून पाहावे लागते.

इतिहासाचे वर्चस्व आज जितके जाणवते ते या पूर्वी कधीही जाणवले नव्हते. आज माणूस काळ आणि इतिहास या दोन्हींमुळे कंटाळला आहे. एकोणिसाव्या शतकातील सार्वभौम सत्तेतून निर्माण झालेली इतिहासाची जाणीव माणसाच्या

www.reliableacademy.com

प्रगतीचा आणि मुक्तीचा संदेश घेऊन आली होती. त्या जाणिवेचे आज क्रूर विडंबन झालेले दिसते. भविष्याला आकार देणारे नियमःकायदे, सूत्र आजही आहेतच मात्र त्यांच्यावर विसाव्या शकतातील अत्याचारांचा आणि दडपशाहीचा इतका खोल प्रभाव आहे की भविष्याच्या बंद खोलीत त्यांना अमलात आणता येत नाही. किती विचित्र परिस्थिती आहे-आजच्या वैज्ञानिक, तर्कपूर्ण विवेक बुद्धीने माणसाला स्वतःच्या भविष्याबाबत असुरक्षित, अशाश्वत आणि घाबरुन टाकले आहे.

खरे तर आम्हाला भविष्य कळत नाही, असे नाही. आजच्या आधुनिक माणसाने इतिहासाच्या जाणिवेतून भविष्याच्या बाबतीत ज्या शक्यता निर्माण केल्या आहेत त्या-आधारे संपूर्ण भविष्यासाठी एखादी प्रयोगशाळा निर्माण करता येईल. परंतु या भविष्याचा वर्तमानाच्या दहशतीशी काहीही संबंध नाही. उलट असेही म्हणता येते की वर्तमानाच्या दहशतीपासून सुटका करुन घेण्यासाठीच 'ऐतिहासिक भविष्याचे' निर्माण करण्यात आले आहे. मग ते वर्गविहीन समाजाचे स्वप्न असो किंवा संगणकाच्या मदतीने हालचाल करणारे रोबोट यंत्रयुग असो. आज आपण वास्तव जगात न जगता काल्पनिक भविष्यात जगत आहोत. आणि विशेष म्हणजे यात माणसाच्या अस्तित्वाला हद्दपार करण्यात आले आहे. कारण स्वतःच्या मृत्यूच्या भीतीने माणसाने भविष्यात शरणागती पत्करली आहे.

या युगाची ही अगतिकताच म्हणावी लागेल की एकीकडे माणूस इतिहासाच्या आकलनामुळे धास्तावलेला आहे आणि दुसरीकडे मरगळलेला भूतकाळ आणि काल्पनिक भविष्य यांत इतिहासाचा जिवंत प्रवाह कोरडा झाला आहे. ज्या प्रमाणे नदीत बुडणाऱ्या माणसाला पाण्याशी नाते जोडता येत नाही त्या प्रमाणे इतिहासाच्या धुंदीत असलेल्या माणसाला काळाचे महत्त्व समजत नाही. तो इतिहासाच्या प्रभावाने भारावून जातो पण याच इतिहासाला आपल्या जन्म-मृत्युचा साक्षीदार त्याला करता येत नाही. आणि जर असे होत असेल तर माणसाचा साक्षीदार नसलेल्या इतिहासाला-देखील काय अर्थ आहे? त्यामुळेच आज इतिहासाचे आकलन हे माणसाची वेडगळ समजूत आहे असे वाटते. आज माणूस इतिहासाकडे भविष्याची सुसंगती लावण्या ऐवजी वर्तमानापासून सुटका करुन घेण्यासाठी वळतो.

खरोखर आपल्याला वर्तमानापासून सुटका करुन घेता येईल का? कारण वर्तमानच एक असा मध्यबिंदू आहे ज्या आधारे माणूस इतिहासात स्वतःचे स्थान समजून घेऊ शकतो. एकीकडे माणूस नश्वर आहे, तर दुसरीकडे इतिहासात जिवंत आहे. त्याची नियती त्याच्या खासगी भूतकाळाशी संबंधित तर आहेच शिवाय ती माणसांच्या संपूर्ण भविष्यकाळाचेही प्रबोधन करते.

*(एकूण शब्द 467)*

**4.** पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात होत असलेल्या नवनवीन संशोधनांमुळे माणसाला ज्या अनेक चकित करणाऱ्या गोष्टी प्राप्त झाल्या आहेत. त्यात माहितीचे तंत्र हे मुख्य आहे. जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून आपण या साधनांच्या माध्यमातून हवी ती माहिती मिळवू शकतो. माहितीच्या सुलभतेमुळे देशांमधील अंतर नाहीसे केले आहे. आतातर असे वाटते की सगळे जग एकवटून आपल्या हातात आले आहे. त्यात पुन्हा 'जागतिकीकरण' आणि 'वसुधैव कुटुंबकम्'या संकल्पना वैज्ञानिक उन्नतीच्या काळात वेगीने साकार होत आहेत, असे जाणवते.

आज तो काळ आठवतो जेव्हां पत्र पाठविण्याची योग्य सोय नव्हती. माहितीचे आदान-प्रदान संदेशवाहकांच्या माध्यमातून केले जात असे. यात फार वेळ जात असे. त्या काळात जगणे किती अवघड असेल याचा साधा अंदाज लावणेही सोपे नाही. काळ बदलला आणि माहितीच्या क्षेत्रात रोज नवीन शोध लागणे सुरु झाले. तार, टेलिफोन, टेलिग्राम, इत्यादींची सोय झाली. पत्रांच्या माध्यमातून निरोप पाठवता येऊ लागले. जीवन गतिमान झाले. रेडियो आणि टेलिव्हिजन यांची वाटचाल सुरू झाली. इंटरनेटचा शोध लागल्यानंतर प्रत्येक संगणक आपापसात जोडले गेले आणि त्यामुळे संवाद साधणे हे जास्त सोपे झाले. माहितीच्या क्षेत्रात नवनवीन बदल होत आहेत. त्यामुले सतत अघयावत माहिती मिळत राहते. माणसाला त्याच्या उत्पादनाची जाहिरात जगभरात कुठेही सहज करता येते. त्याला पारंपारिक आयुधांचा वापर केल्याशिवाय देखील कुणाशीही स्पर्धा करता येते. आज जवळ-जवळ प्रत्येक घरात, कार्यालयात संगणक आणि इंटरनेटची सोय उपलब्ध आहे विमान, बस, रेल्वे आणि सिनेमाची तिकिटे सहज काढता येतात, आरक्षणाची अघयावत माहिती मिळवता येते. वाहतुकीची स्थिती जाणून घेता येते. मोबाईल-वर तर आज घरबसल्या हवे ते मागवता येते. खरोखरच संवाद आणि माहितीचे हे एक सर्वात स्वस्त साधन आहे.

**5.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

Democracy stands much superior to any other form of government in promoting dignity and freedom of the individual. Every individual wants to receive respect from fellow beings. Often conflicts arise among individuals because some feel that they are not treated with due respect. The passion for respect and freedom are the basis of democracy. Democracies throughout the world have recognized this, at least in principle. This has been achieved in various degrees in various democracies. For societies which have been built for long on the basis of subordination and domination, it is not a simple matter to recognize that all individuals are equal.

Take the case of dignity of women. Most societies across the world were historically male dominated societies. Long struggles by women have created some sensitivity today that respect to and equal treatment of women are necessary ingredients of a democratic society. That does not mean that women are actually always treated with respect. But once the principle is recognized, it becomes easier for women to wage a struggle against what is now unacceptable legally and morally.

www.reliableacademy.com 92223

6. *(a)* खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे

*(ii)* कान टोचणे

*(iii)* हरभऱ्याच्या झाडावर चढणे

*(iv)* तुझे माझे जमेना नि तुझ्यावाचून करमेना

*(v)* पळसाला पाने तीनच

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा *10* वाक्यात विस्तार करा : 5×2=10

*(i)* ऐकावे जनाचे करावे मनाचे

*(ii)* थांबला तो संपला

*(c)* खाली दिलेल्या विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

वस्तू आणि सेवा करप्रणाली

*(d)* खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×5=5

*(i)* राजा

*(ii)* हुशार

*(iii)* अरण्य

*(iv)* जमीन

*(v)* वीज

www.reliableacademy.com 9222333999

*(e)* खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1×5=5

*(i)* अमृत

*(ii)* आस्तिक

*(iii)* किमान

*(iv)* पुरोगामी

*(v)* सुसंगत

* * *

www.reliableacademy.com 9222333999